Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-7 | Jan-2014
Available online at www.lbp.world

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वर्ण–जातीव्यवस्था विषयक विचार

प्रा. बोडखे संजीव सुखलाल
इतिहास विभाग , शरदचंद्र पवार महाविद्यालय लोणंद,
ता.खंडाळा जि.सातारा .

प्रस्तावना

भारतात जातीव्यवस्था ही हिंदू समाजासमोर एक समस्या आहे. भारतामध्ये प्राचीन काळापासून वर्ण व जातीव्यवस्था रूढी परंपरेने चालत आलेल्या आहेत. यामध्ये सुधारणा करण्यासाठी मोठया प्रमाणावर प्रयत्न झाला. परंतु यामध्ये समाजसुधारकांनी आपल्या स्वजातीच्या कुलाचाराच्या शुद्धीकरणापलिकडे न जाता कार्य केल्याने त्यामध्ये सुधारणा होऊ शकल्या नाहीत.याचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, सामाजिक सुधारणेचा जप करूनही या समाजसुधारकांना समाजातील जातीभेद , स्पर्शास्पर्श भेद नष्ट करता आला नाही. ही त्यांची मर्यादा होती. याला कारण हिंदू समाजव्यवस्थेची अंतर्गत रचना या रचनेचा एतद्देशीय जीवनावर प्रभाव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यांचा पाया असलेल्या हिंदू समाजात अत्यंत वाईट अनुभव आले आहेत. ज्या समाजात जातीव्यवस्था आहे. त्या माणसाला गुलाम बनविले जाते या आलेल्या अनुभवामुळे त्यांनी आपल्या वृत्तपत्रातून सर्वाधिक सामाजिक विचार वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था यासंबधी मांडले आहेत.

डॉ.आंबेडकरांचे वर्णव्यवस्थेसंबंधी विचार

हिंदू समाज हा आरंभी चार वर्णात विभागलेला होता. वर्ण हा माणसाच्या जन्मावर सत्त्वावर आधारलेला होता. पुढे वर्ण हा जातीवर आधारला गेला. चार वर्णाचे रूपांतर चार जातीत झाले. जातिभेद व्यवस्था ही एकाच वंशाच्या लोकांची सामाजिक विभागणी आहे. ती केवळ श्रमाची विभागणी करते असे नाही. ती श्रमिकांची सुद्धा विभागणी करते. एखाद्या मनुष्यास जो धंदा आवडत नाही तो करण्यास ती त्याला भाग पाडते. हिंदू समाजाची चातुर्वण्याची पायावर पुनर्रचना करणे अशक्य नि अपमानकारक आहे. कारण चातुवर्ण्य व्यवस्था ही अशी आहे. की, तिचा अपकर्ष निरनिराळया जाती बनण्यातच होत असतो. चातुर्वर्ण्याच्या नियमाप्रमाणे शुद्राला ज्ञान संपादन करण्यास बंदी आहे. आर्थिक उत्पादनाचा त्याला धंदा करता येत नाही.[1]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते ज्या भेदावर ब्राहमणब्राहमणेत्तराची उभारणी झाली आहे. तो भेद इतर धर्मात नसून हिंदू धर्मातच काय तो आहे. इतर धर्मातील अनुयायात जे भेद दिसून येतात ते भेद विभागशः या तत्त्वाच्या पोटी निर्माण झालेले आहेत. त्याच तत्त्वावरून साहजिकपणे पडणाऱ्या उभ्या भेदांच्या तटबंद्याही हिंदू समाजात आहेत, पण त्याशिवाय जन्मजाती विभागशः या तत्त्वानुरूप पडणाऱ्या आडव्या भेदांच्या ज्या अनेक तटबंद्या हिंदू समाजात दिसतात. त्या दुसऱ्या कोणत्याही समाजात दिसत नाहीत. या दुहेरी विभागणीनुसार गुणभेदांचे उभ्या तटबंदीमुळे पृथक होऊन बसले आहेत.[2]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू समाजातील वर्णववस्था व जातीव्यवस्था यांचा एकत्रिकरणामुळे निर्माण झालेली विचित्र व्यवस्था याकडे लक्ष वेधले आहे. पाश्चिमात्य राष्ट्रामध्ये संपत्ती, व्यवसाय यावर आधारित वर्गव्यवस्था आहे. त्यामुळे तिथे श्रीमंत, मध्यम, गरीब असा भेद आहे व हीच भेदांची मर्यादा आहे. पण हिंदू समाजात मात्र वर्गभेदाची मर्यादा इथे संपत नाही. त्यामुळे श्रीमंत ब्राहमण, श्रीमंत महार, ब्राहमण मजूर, मराठा मजूर असा जातीपरत्वे भेदभाव आहे. म्हणजे वर्ग गरीब, श्रीमंत, मध्यम असतो. त्याला भारतात पुन्हा जात जोडली जाते. त्यामुळे वर्गापुढे जातींना अपरिहार्यच जोडले जाते. इतर राष्ट्र व समाजामध्ये मात्र असे विचित्र वर्गीकरण नाही.भारतातील हिंदू धर्मप्रेरित हिंदू समाजात त्यामुळे दुहेरी वर्गवारी वा स्तरीकरण आहे. त्यांनी याकडे लक्ष वेधले आहे.[3]

डॉ. आंबेडकर यांच्या मते, हिंदूच्या या दुहेरी स्तरीकरणाला आडवे स्तर म्हणजे जातीस्तरीकरण व्यवस्था नष्ट करण्याच्या उद्देशानेच ब्राहमणेत्तर चळवळीचे कार्य चालते. उभे भेद म्हणजे वर्गभेद नष्ट करण्याकडे नाही उलट पाश्चिमात्य राष्ट्रातील चळवळी उभे वर्गभेद नष्ट करण्याचा प्रयत्न करीत असतात.[4]

डॉ. आंबेडकरांचे हे विचार समाजशास्त्रीयदृष्टया आशयपूर्ण तर आहेतच, परंतु वास्तववादीही आहेत. त्यातून नेमकी हिंदूची समाजरचना कळते. त्यातील दोष समजतात आणि कोणते दोष नष्ट करण्याची आवश्यकता आहे याचे ज्ञान होते. तसेच वर्गभेदाला जातीभेद जोडल्यामुळे झालेल्या विचित्र स्तरीकरणाचे स्वरूप समजते.[5]

डॉ. आंबेडकरांच्या मते, हिंदू समाज ही अनेक जातीची उतरंड आहे आणि या उतरंडीतील प्रत्येक जात उपजात आपल्या पायरीखाली कोणाची तरी जात आहे. याबाबत खूष असते. आपण कुणाच्या तरी वरच्या पायरीवर आहोत ही एक मानसिकता हिंदू जातीची आहे. ही एक प्रकारची तटबंदी होय.[6]

हिंदू समाजाची ही तटबंदी का निर्माण झाली यासंबंधी त्यांनी दिलेले उदाहरण अत्यंत मार्मिक आणि कठोर आहे. पण त्यामुळेच हिंदू समाज शकलांकित झाला आणि प्रत्येक जातीच्या तुकडयाला गौरव वाटू लागला यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बोट ठेवले आहे. 'ब्राहमण म्हणजे जन्मजात भेदाभेद, उच्चनीचता, पवित्र अपवित्र भावना या वृत्तीवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. त्यामुळे हिंदू समाजातील वर्गव्यवस्था यांचा विचार समानच केला गेला.म्हणजेच जाती अशा जन्माने श्रेष्ठ तशा गुणांनेही श्रेष्ठ मानल्या गेल्या. तसेच जन्माने कनिष्ठ तशा गुणानेही कनिष्ठ मानल्या गेल्या. म्हणजेच श्रेष्ठ जातीचे श्रेष्ठ गुण व कनिष्ठ जातीचे कनिष्ठ गुण अशी सांगड घातली गेली.[7]

डॉ. आंबेडकरांच्या मते, ब्रिटीशांच्या शिक्षण, सुधारणा, कारखाने आणि विज्ञान यांच्याद्वारे या तटबंदीचा ऱ्हास सुरू झालेला आाणि त्यामुळे हिंदू समाजातील वर्ण व जातीव्यवस्थेत परिवर्तन झाले. त्यामुळे हिंदू समाजाची पूर्वीची घडी बिघडली गेली व ब्राहमणांच्या पोटी गुणहीन शुद्रवृत्तीची संतती आणि शुद्राच्या पोटी गुणवान ब्राहमण वृत्तीची संतती जन्मास येऊ लागली. अशापरी गुणांचा आणि जातींचा प्रत्यक्ष विरोध उत्पन्न झाला.[8]

अशा प्रकारच्या विरोधामुळेच पुढे ब्राहमणविरूद्ध चळवळी सुरू केल्या आहेत आणि ब्राहमणांचा अत्यंत द्वेष केला आहे. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ब्राहमण जातीचा द्वेष केलेला त्यांच्या अग्रलेखातून आढळत नाही तर 'ब्राहमण्याच्या कल्पनेचा द्वेष केलेला आहे. कारण 'ब्राहमण्य' म्हणजे विषमता–श्रेष्ठकनिष्ठता, पवित्र–अपवित्रता, स्पृश्य–अस्पृश्यता या विषारी भावना बाळगण्याची व पाळण्याची प्रवृत्ती आहे. ती हिंदू समाजातील केवळ 'ब्राहमण्य' जातीतच आहे असे नाही. ती ब्राहमणेत्तरातही आहे किंवा असते. अशी 'ब्राहमण्य' संकल्पना त्यांनी मांडली आहे. ब्राहमण्यातून निर्माण झालेल्या विषमतावादी वर्तनाला आणि तसे वर्तन करणाऱ्याला त्यांचा विरोध आहे. म्हणूनच त्यांनी महाड सत्याग्रहाच्या प्रसंगी ब्राहणेत्तर चळवळीचे नेत्यांनी या सत्याग्रहात कोणत्याही ब्राहमण जातीतील गृहस्थास सामील करून घेऊ नये, घातलेली अट डॉ. आंबेडकरांनी फेटाळून लावली आहे. ते म्हणाले की मी ब्राहमन जातीचा व ब्राहमण लोकांचा द्वेष करीत नाही. तर मी ब्राहमण्याचा द्वेष करतो.[9]

डॉ. आंबेडकरांचे जातीव्यवस्था विषयक विचार

जातिव्यवस्था ही मनुष्याच्या कर्तृत्वाला लुळे, निर्बल, पंगू करते. समाजाला उपयुक्त अशा कर्तृत्वायास ती मुकविते. जातिव्यवस्थेचा उगम प्रजोत्पादन शास्त्रात आहे म्हणावे तर तसेही नाही. ज्या व्यवस्थेत वरिष्ठ दर्जाचे लोक आपली सत्ता कनिष्ठ वर्गावर लादण्याइतके बलवान होतात अशा हिंदू समाजातील लहानशा दुराग्रही गटाच्या अहंकाराने नि स्वार्थाने बरबटलेली ही सामाजिक रचना आहे, आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने जातिव्यवस्था कार्यक्षम होत नाही. कारण त्यात मनुष्याला आपल्या नैसर्गिक प्रवृत्तीप्रमाणे कामधंदा करण्याची संधी मिळत नाही.[10]

डॉ. आंबेडकर यांनी हिंदू समाजाच्या उत्कर्षाचे उद्दिष्ट समोर ठेवले होते. म्हणूनच त्यांनी हिंदू समाजरचनेतील दोष दाखविताना आपण स्वतः हिंदू धर्माचे व समाजाचे अविभाज्य घटक आहोत हे प्रारंभी लक्षात घेतले आहे. हिंदू समाज विकलांग होऊ नये. विघटित होऊ नये. म्हणून त्यांनी प्रारंभापासून जातीव्यवस्थेवर लिहिले आहे. जातीव्यवस्थेमुळे हिंदू समाजाचे कोणते नुकसान झाले हे प्रांजळपणे अग्रलेखात मांडले आहे.

डॉ. आंबेडकर यांच्या मते, जातीभेदामुळे हिंदू जातीत परस्पराबद्दल इतका अविश्वास व द्वेष आहे की, त्यांना परदेशीय राजा चालतो. पण स्वकीय कोणत्या ना कोणत्या जातीचा शिक्का असलेला राजा चालत नाही. तसेच प्रत्येक जात आपल्याच पुढाऱ्यास मानते. त्याची गुणवत्ता असो वा नसो. पुढाऱ्यामध्ये जातीमुळेच लाथाडया आहेत. एकजूट होत नाही. जातीभेदामुळे स्वराज्याविषयीची तळमळ कमी होत आहे. जातीद्वेश व श्रेष्ठनिष्ठता जन्माने वा वंशपरंपरेने चालत आल्याने जातीसंघर्ष सातत्याने फोफावतो. जातीभेदामुळे सामाजिक सुधारणांचे कार्य व सामाजिक परिवर्तनाचे कार्य कठीण झाले आहे. जातीभेदामुळे हिंदू समाजाची वृद्धी खुंटली आहे व त्याचा क्षय वाढत चालला आहे. जातीभेद म्हणजे देशद्रोह असून मानव द्रोही आहे.[11]

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेबांनी आपल्या या विचारातून हिंदू समाजाला जातीव्यवस्थेच्या हानीकारक स्वरूपाची कल्पना देऊन दक्ष राहण्याचा सल्लाच दिला आहे. परिवर्तन करण्याचा मार्ग सांगितला आहे. जातीव्यवस्थेमुळे देशाला वारंवार पारतंत्र्यात कसे जावे लागले व अस्पृश्यत न्यूनगंड कसा निर्माण झाला याबद्दल त्यांनी लिहीले आहे की, जातीसंस्थेमुळे प्राचीन काळापासून जातीवर्चस्वातून संघर्ष होत राहिले. त्यामुळे परकीय सत्ता वारंवार देशावर प्रस्थापित झाली. स्त्रीशूद्रांना कनिष्ठ मानल्याने त्यांच्यात कनिष्ठत्वाचीच मानसिकता निर्माण झाली. श्रेष्ठ कनिष्ठता हे दैवी कारण मानले गेले. त्यामुळे अन्याय सहन करण्यासच नशीब मानले गेले व वर्चस्व लादणाऱ्याबद्दल पुढे कालांतराने त्यांच्या मनात आदराची व पुण्यतेची भावना वाढून दृढ झाली. तर स्वतःला श्रेष्ठ मानणाऱ्यांनी स्वतःस श्रेष्ठ मानण्यास कनिष्ठांना भाग पाडून पिढयानपिढया धार्मिक मानसन्मान प्रतिष्ठा बळजबरीने स्वतःकडे घेतली. ब्राहमणांची ब्राहमणेत्तरांशी अस्पृश्याशी असणारी वागणूक हे याचे जिवंत प्रतिक आहे. तसेच श्रेष्ठकनिष्ठतेमुळे कनिष्ठांच्या कर्तबगारीस व गुणवत्तेस हजारो वर्षापासून हिंदू समाज मुकला गेला. त्यांच्यात महत्त्वाकांक्षाचे बीजारोपण या विषमतेमुळे झाले नाही.[12] अशा सामाजिक विचारातून त्यांनी अस्पृश्यता व जातीव्यवस्थेच्या विषमतावादी स्वरूपात निर्माण झालेल्या विविध सामाजिक समस्यांची स्पृश्यांना व अस्पृश्यांना जाणीव करून देऊन सामाजिक परिवर्तनास प्रेरित केलेले आहे. त्यांच्या मते, हिंदू धर्माच्या सामाजिक बंधनामुळे जातीनुसार व्यक्तीचा दर्जा, व्यवसाय, जगणे व पायरी निश्चित झाल्यामुळे व पायरी ओलांडणे अधर्म मानले गेल्याने कनिष्ठ वर्गात मोठी व गुणवान माणसे निपजली नाहीत. हे महत्त्वाचे कारण आहे. ब्राहमणाच्या खाणीतून हिरे निघतात आणि शुद्रांच्या खाणीतून सारे कोळसेच निघतात. अशा खोटया समजुतीला हिंदू समाज बळी पडला आहे. हिंदू समाजाची काठी मजबूत राहावयाची असेल तर जेथे जेथे म्हणूण गुणांचा अंश असेल तेथे तेथे त्याचा पूर्ण विकास होईल अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे.[13] जातीभेद, जातीसंस्था आणि जातीनिष्ठता ही हिंदू समाजाची व्यवच्छेदक वैशिष्टये आहेत. व त्यामुळे हिंदू समाजात 'जात' ही जाणीव जागृत कशी आहे हे समाजशास्त्रीय भूमिकेतून त्यांनी प्रतिपादन करून हिंदू समाजाची जातीनिष्ठ व जातीभ्रष्ट तो जो जातीनियम सोडून वागतो. त्यामुळे समाज सुधारणा करणे कसे कठीण झाले आहे. यासंबंधीची चिंता त्यांनी व्यक्त केली असून ही विभागणी नष्ट

केली पाहिजे ही भूमिका मांडली आहे. डॉ. आंबेडकर यांच्या मते, हिंदू समाजात जातीशिवाय गत नाही आणि जन्माशिवाय जात नाही वा जातीशिवाय माणूस नाही. त्यामुळे त्या समाजात कोणीही परधर्माचा माणूस येण्यास धजत नाही. आतल्याला बाहेर जाण्याचा मार्ग हिंदू धर्माने मोकाल ठेवला आहे, पण बाहेरच्यांना आत येण्याचा मार्ग बंद करण्यात आला आहे. या विधीमुळे पाणी आत येण्याची तोटी बंद आहे. पण पाणी बाहेर सोडण्याची तोटी खुली असलेला हौद जसा शुष्क होऊन त्यात पाण्याचा एक टाकही उरत नाही, तशी स्थिती हिंदू समाजाची न व्हावी व हा सारा अनर्थ टळावा असे जर वाटत असेल तर जातीभेदाचे उच्चाटन करणे अंत्यत आवश्यक आहे.14

समारोप

अशा प्रकारे जातीभेद व जातीव्यवस्था हेच हिंदू धर्म व हिंदू समाजाच्या अनर्थाचे मूळ कारण कसे आहे त्यावर त्यांनी परखड विचार मांडले आहेत. त्यांचे हे विचार पाहिले असता असे दिसून येते की, त्यांनी जातीव्यवस्थेचा गाढा अभ्यास केलेला आहे. हिंदू समाजातील श्रेष्ठकनिष्ठता, स्पृश्यअस्पृश्यता, पवित्र अपवित्र, सोवळे–ओवळे या कल्पनाचे चिंतन केले आहे. जातिभेदामुळे प्रतिष्ठीत हिंदू अरेरावाकडे अनियंत्रित सत्ता गेली तर त्यापासून गरीबांचे हित होईल की नाही याविषयी चिंता व्यक्त केली. जातिव्यवस्थेचे दुष्परिणाम हिंदूच्या नितीमत्तेवर झाले आहेत. तिने सार्वजनिक ही बुद्धी नष्ट केली आहे. धर्मादाय बुद्धीचा नाश केला आहे. जनमताचे क्षेत्र संकुचित केले आहे. मनुष्याची निष्ठा ही जातीपुरतीच मर्यादित राहते मनुष्याचे सद्‌गुण नीती ही सुद्धा जातिबंधनानी आवळलेली असते.

संदर्भ

1) किर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 2006, पृ. 300
2) बहिष्कृत भारत, दुःखात सुख, दि.1 जुलै 1927
3) खंडाळे, इंगोले विजया, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : एक समाजशास्त्रीय विश्लेषण, स्वरूप प्रकाशन, औरंगबाद, पृ. 154
4) बहिष्कृत भारत, दुःखात सुख, दि.1 जुलै 1927
5) खंडाळे, इंगोले विजया, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : एक समाजशास्त्रीय विश्लेषण, उपरोक्त, पृ. 154
6) बहिष्कृत भारत, दुःखात सुख, दि.1 जुलै 1927
7) खंडाळे, इंगोले विजया, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता : एक समाजशास्त्रीय विश्लेषण, उपरोक्त, पृ. 155
8) बहिष्कृत भारत, दुःखात सुख, दि.1 जुलै 1927
9) कित्ता, पृ.9
10) किर धनंजय, उपरोक्त, पृ.301
11) बहिष्कृत भारत, हिंदूचे धर्मशास्त्र, त्याचे क्षेत्र आणि त्यांचे अधिकार, दि. 21.12.1928
12) कित्ता,
13) कित्ता.
14) कित्ता